पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४२। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | बुधवार ०७/१०/२०२६ । पान- ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी

१९५९ पासून
राजेंद्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

# एमपीएससीचे अध्यक्ष भीमनवार यांचा राजीनामा ?

## रोहीत पवार यांच्या दाव्याने सरकारमध्ये खळबळ



पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) अध्यक्ष विवेक लक्ष्मीकांत भीमनवार यांनी दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राजीनामा पाठविल्याचा खळबळजनक दावा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. मात्र, या दाव्यावर सरकारकडून अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. दरम्यान, विद्यार्थ्यांचा वाढता रोष लक्षात घेता मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना पत्र लिहून संविधानाच्या कलम ३१७ अन्वये भीमनवार यांच्याविरोधात चौकशीची प्रक्रिया सुरू करण्याची विनंती केल्याचे समोर आले आहे.

औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी तसेच एमपीएससीच्या कामकाजासंदर्भातील विविध मागण्यांसाठी पुण्यात स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे ठिय्या आंदोलन सुरू आहे. आंदोलनाचा मंगळवारी सहावा दिवस होता. या आंदोलनाला रोहित पवार यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी भीमनवार यांच्या राजीनाम्याबाबत दावा केला.

'भीमनवार यांनी रविवारी सायंकाळीच मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे राजीनामा पाठविला आहे. आमच्याकडे याबाबत पक्की माहिती आहे. मात्र, अद्याप मुख्यमंत्र्यांनी यावर कोणतीही भूमिका स्पष्ट केलेली नाही,' असे रोहित पवार म्हणाले. भीमनवार यांनी राजीनामा राज्यपालांकडे सादर करणे अपेक्षित असताना तो मुख्यमंत्र्यांकडे का पाठविण्यात आला, असा सवालही पवार यांनी उपस्थित केला. 'राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे पाठवून त्यांनी चेंडू फडणवीस यांच्या कोर्टात टाकला आहे. फडणवीस यांनी निर्णय घेतला नाही, यामागे नेमके कारण काय?' असा सवाल त्यांनी केला.

फडणवीस आणि भीमनवार यांच्यातील संबंधांचा उल्लेख करत रोहित पवार यांनी सरकारवर गंभीर आरोप केले. भीमनवार यांचा राजीनामा स्वीकारून तो राज्यपालांकडे पाठविण्याऐवजी सरकारने या विषयावर मौन बाळगले आहे. त्यामुळे आता हा प्रश्न प्रशासनिक न राहता मुख्यमंत्र्यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेचा किंवा 'इगो'चा विषय बनल्याचा आरोप त्यांनी केला. 'भीमनवार यांचा राजीनामा राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठविला, तर पुढे अन्य अधिकाऱ्यांच्या राजीनाम्याची मागणी होऊ शकते, अशी भीती सरकारला आहे. त्यामुळे सरकार निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत आहे,' असा दावा पवार यांनी केला.

दरम्यान, आंदोलक विद्यार्थ्यांचा वाढता रोष आणि भीमनवार यांच्यावरील आरोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना पत्र लिहिल्याचे सांगण्यात येत आहे. संविधानाच्या कलम ३१७ नुसार एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या चौकशीची प्रक्रिया सुरू करून त्यांना पदावरून हटविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांकडे केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे एकीकडे भीमनवार यांनी राजीनामा दिल्याचा रोहित पवार यांचा दावा, तर दुसरीकडे मुख्यमंत्र्यांकडून राज्यपालांकडे चौकशी व पदावरून हटविण्याच्या प्रक्रियेची विनंती, यामुळे एमपीएससी अध्यक्षपदाचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.

# दिल्लीतील वातावरण तापले

## राहुल गांधी-प्रियंका गांधींना पोलिसांनी घेतले ताब्यात





नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

मतदार यादीत करण्यात आलेल्या फेरफाराचा आरोप करत 'इंडिया' आघाडीने आज मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात जोरदार मोर्चा उघडला. निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करत विरोधकांनी संसदेपासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे कूच केली. या आंदोलनामुळे मध्य दिल्लीतील सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली होती. आंदोलनादरम्यान राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान एक थरारक दृश्य पाहायला मिळाले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हातात तिरंगा घेऊन थेट पोलिसांच्या बॅरिकेड्सवर चढले. पोलिसांनी रस्ता अडवल्यानंतर राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी रस्त्यावरच धरणे आंदोलन सुरू केले. काही वेळातच पोलिसांनी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासह 'इंडिया' आघाडीच्या अनेक खासदारांना ताब्यात घेतले. राहुल गांधींना घेऊन जाणारी पोलिसांची बस कार्यकर्त्यांच्या प्रचंड गर्दीमुळे काही काळ रस्त्यातच अडकून पडली होती. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाण्यासाठी गनिमी कावा केला. राहुल गांधी आणि काही खासदार जवळच असलेल्या आकाशवानी भवनात अचानक गेले. त्या ठिकाणाहून राहुल गांधी यांनी आयोगाच्या कार्यलयात शिरण्याचा प्रयत्न केला. या ठिकाणी हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला आहे. दिल्लीतील राजकारण तापले आहे. राहुल गांधींसह विरोधीपक्षातील अनेक खासदारांनी (पान ५)



परिवार जिसका मंदिर था,
स्नेह जिसकी शक्ती थी |
परिश्रम जिसका कर्तव्य था,
परमार्थ जिसकी भक्ती थी |

ऐसी आपकी दिव्य आत्माको ईश्वर शांती प्रदान करे..

माहेश्वरी समाजाचे सरपंच

स्व. विश्वनाथजी कलंत्री

(स्वर्गवास - ४ ऑक्टोबर २०२६, वय - ८६ वर्षे)

यांना
भावपूर्ण श्रध्दांजली

- शोकाकूल -
कलंत्री परिवार, संगमनेर

# जिल्हा बँक निवडणुकीत शिवसेनेची एन्ट्री

## संगमनेर तालुक्यातून शिवसेनेचे तीन उमेदवार मैदानात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी आता चांगलीच रंगली असून, विविध राजकीय पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेनेही जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेत जिल्हा बँकेत शिरकाव करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून संगमनेर तालुक्यातून शिवसेनेच्या वतीने तीन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विविध राजकीय गटांकडून उमेदवार रिंगणात उतरविले जात असल्याने आगामी काळात निवडणुकीतील राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट होणार आहेत. या निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडीने शिवसेनेला विश्वासात न घेता निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र, आता उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या सर्वच नेत्यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत स्वतंत्रपणे ताकद दाखविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत चुरस वाढण्याची शक्यता आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातून आपले उमेदवार मैदानात उतरवित शिवसेनेने सहकारातील नेत्यांसमोर आव्हान उभे केले आहे. त्यामुळे आता जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील चुरस वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ व माजी खासदार सदाशिव लोखंडे

### आ. लंघे, आ. खताळ लोखंडे यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल

यांच्या प्रमुख उपस्थितीत शेती सहकारी संस्था मतदारसंघातून निमज येथील बादशाह दत्तू गुंजाळ, शेतीपूरक व शेतीमाल प्रक्रिया व पणन संस्था मतदारसंघातून मंगळापूर येथील शंकर मारुती वाळे, तर अनुसूचित जाती-जमाती राखीव मतदारसंघातून पंढरीनाथ माधव इल्हे यांनी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, कमलाकर कोते, रावसाहेब खेवरे, प्रशांत लोखंडे, विठ्ठल घोरपडे, रमेश काळे, रामभाऊ राहणे, राजेंद्र सोनवणे, दादाभाऊ गुंजाळ, डॉ. संतोष डांगे, दत्तात्रय दिघे, शशिकांत मतकर यांच्यासह संगमनेर, अकोले व श्रीरामपूर तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# भाऊसाहेब विखे पाटील यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

लोणी - विखे पाटील कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य भाऊसाहेब विठ्ठलराव विखे पाटील (वय ९१) यांचे रविवारी रात्री उपचारादरम्यान निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर आजारपणामुळे उपचार सुरू होते. रात्री साडेआठच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

भाऊसाहेब विखे पाटील हे लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे धाकटे बंधू तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे चुलते होते. त्यांच्या निधनाने विखे पाटील कुटुंबीय, नातेवाईक आणि परिसरात शोककळा पसरली आहे.

त्यांच्यावर मंगळवारी (६ ऑक्टोबर) सकाळी लोणी बुद्रुक येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले विक्रांत, विक्रम व विजय, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. अशोकराव विखे पाटील, डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. राजेंद्र विखे पाटील यांचे ते चुलते होते. तसेच एकनाथ घोगरे आणि सुरेश कोल्हे यांचे ते सासरे होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. भाऊसाहेब विखे पाटील यांना दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# जलजीवन गैरव्यवहारप्रकरणी तत्कालीन 'सीईओं'वर कारवाई करा

## वाया गेलेल्या निधीची वसुली करण्याची दहातोंडे यांची मागणी




## अपूर्ण कामांवर कोट्यवधींची बिले काढल्याचा आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जलजीवन मिशनअंतर्गत अहिल्यानगर पाणीपुरवठा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, आर्थिक गैरव्यवहार आणि गंभीर त्रुटी आढळून आल्याचा आरोप अखिल भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय सरचिटणीस संभाजी दहातोंडे पाटील यांनी केला आहे. या गैरव्यवहारास जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) देखील जबाबदार असल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, तसेच वाया गेलेल्या शासकीय निधीची संबंधितांकडून वसुली करावी, अशी मागणी दहातोंडे यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

याबाबत त्यांनी राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदन देऊन सखोल चौकशीची मागणी केली आहे. जलजीवन मिशनच्या योजनांच्या तपासणीदरम्यान गंभीर त्रुटी, आर्थिक अनियमितता आणि गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील सहा अधिकारी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले; मात्र केवळ कनिष्ठ व मध्यम स्तरावरील अधिकाऱ्यांवर कारवाई करून प्रकरण थांबविणे योग्य नसल्याचे दहातोंडे यांनी म्हटले आहे.

कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांच्यावर कारवाई झाली असली, तरी योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे, असा मुद्दा दहातोंडे यांनी उपस्थित केला आहे. (पान ४ वर)

# संगमनेरजवळ १५२ किलो गांजा जप्त; ८९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत'

## दोन तस्कर जेरबंद, मुख्य सूत्रधारासह तिघे फरार



संगमनेर : पुणे-नाशिक महामार्गावर सायखिंडी फाटा येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत तब्बल १५२ किलो ६१ ग्रॅम उच्च प्रतीचा गांजा जप्त केला. या कारवाईत वाहनासह एकूण ८८ लाख ७७ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला असून, दोन गांजा तस्करांना अटक करण्यात आली आहे. या तस्करीचा मुख्य सूत्रधार तसेच त्याचे तीन साथीदार अद्याप फरार असून, पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत.

आसाम व ओडिशा राज्यातून मोठ्या प्रमाणात गांजा आणून तो वाहनातून पुण्याच्या दिशेने नेला जात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार सोमवारी सकाळी सायखिंडी फाटा येथे पोलिसांनी सापळा रचला. संशयास्पद वाहन अडवून तपासणी केली असता सुरुवातीला संशयितांनी पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी वाहनाची बारकाईने झडती घेतली असता त्यामध्ये प्लॅस्टिकच्या ११ सीलबंद गोण्या आढळून आल्या.

पंचांसमक्ष गोण्या उघडून तपासणी केली असता त्यामध्ये गांजाची शेंडे, पाने व बिया असलेला उग्र वासाचा उच्च प्रतीचा गांजा आढळून आला. वजन केल्यानंतर त्याचे एकूण वजन १५२ किलो ६१ ग्रॅम भरले. तस्करांनी पोलिसांची नजर चुकविण्यासाठी वाहनावर बनावट नंबर प्लेट लावल्याचेही तपासात समोर आले आहे.

या कारवाईत दत्तात्रय नानाभाऊ इचके (रा. कवठे यमाई, ता. शिरूर, जि. पुणे) आणि श्रीहरी बाळू मिडगुले (रा. कान्हूर यमाई, ता. शिरूर, जि. पुणे) यांना अटक करण्यात आली. त्यांची कसून चौकशी केली असता हा गांजा आसाम येथून 'कुंग्फू' नामक व्यक्तीकडून आणल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली.

प्राथमिक तपासात हा गांजाचा साठा साहेबराव उर्फ भाऊसाहेब बाळू मिडगुले (रा. कान्हूर यमाई) आणि विशाल उर्फ दादा साळुंके (रा. पुणे) यांच्याकडे सुपूर्द केला जाणार होता. त्यानंतर हा गांजा पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी विक्रीसाठी पाठविण्याचा कट असल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणातील कुंग्फू, साहेबराव मिडगुले आणि विशाल साळुंके यांच्यासह अन्य संशयितांचा पोलीस शोध घेत आहेत.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव व त्यांच्या पथकाने केली. पथकात विजय पवार, रिचर्ड गायकवाड, विकास साळवे, राहुल डोके, भीमराज खरसे, भगवान थोरात, सुनील मालनकर आणि महादेव भांड यांचा समावेश होता.

# हिंसाचार होणार हे आधीच कसं कळलं ?

## दिपकेंचा पोलिसांना सवाल



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

जंतर-मंतर येथे होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर पोलिसांनी आपल्या काही कार्यकर्त्यांना नोटिसा बजावल्याचा दावा अभिजीत दिपके यांनी केला आहे. या नोटिशींमध्ये आंदोलकांनी दिल्लीतील आंदोलनात सहभागी होऊ नये तसेच आंदोलन हिंसक होण्याची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आल्याचे दिपके यांनी सांगितले. यावरून त्यांनी पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करत, आंदोलन हिंसक होणार असल्याची माहिती पोलिसांना आधीच कशी मिळाली, असा सवाल केला.

अभिजीत दिपके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, त्यांच्या काही व्हॉलेंटियर्सना चंद्रपूर पोलिसांकडून नोटिसा देण्यात आल्या आहेत. जंतर-मंतरवरील आंदोलनात सहभागी होऊ नये, अशी सूचना या नोटिशीत करण्यात आल्याचा त्यांचा दावा आहे. दिल्लीला जाण्याचा खर्च कुठून येणार, याबाबतही पोलिसांनी माहिती मागितल्याचे दिपकेंनी सांगितले.

मात्र आंदोलन हिंसक होण्याची शक्यता असल्याचा उल्लेख नोटिशीत कसा करण्यात आला, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आंदोलन सुरू होण्यापूर्वीच पोलिसांना हिंसाचाराची शक्यता कशी कळली? असा सवाल करत त्यांनी याबाबत पोलिसांकडे काही ठोस माहिती किंवा पुरावा आहे का, असे विचारले. आपल्या आंदोलनातून हिंसाचाराचे आवाहन करण्यात आल्याचा दावा पोलिसांनी केला असेल, तर त्याचा पुरावा द्यावा, असे आव्हान दिपके यांनी दिले. आंदोलक सातत्याने महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा उल्लेख करत असल्याचे सांगत, हे विचार पोलिसांना हिंसक वाटतात का, असा सवाल त्यांनी केला.













शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# मंजूर घरकुलाचा निधी दुसऱ्याच खात्यावर

## एकल महिलेचा उपोषणाचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेत घरकुल मंजूर होऊनही अनुदानाची रक्कम स्वत:च्या खात्यावर मिळत नसल्याने कोतुळ (ता. अकोले) येथील एकल महिला आशा मुरलीधर जमदाडे यांनी प्रशासनाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर झालेल्या घरकुलाचे तब्बल १ लाख १५ हजार रुपयांचे अनुदान आपल्या खात्यावर जमा न होता दुसऱ्याच महिलेच्या खात्यावर जमा झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वारंवार ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी न लागल्याने त्यांनी आता उपोषणाचा इशारा दिला आहे.

आशा जमदाडे यांचे घरकुल योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे. त्यानुसार घरकुलाच्या बांधकामासाठी मिळणारे अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा होणे अपेक्षित होते. मात्र, त्यांच्या म्हणण्यानुसार अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यावर न येता अश्विनी संजय पवार यांच्या बँक खात्यावर जमा झाली.

जमदाडे यांच्या म्हणण्यानुसार, घरकुलाचा पहिला हप्ता १५ हजार रुपये, दुसरा हप्ता ७० हजार रुपये आणि तिसरा हप्ता ३० हजार रुपये, अशी एकूण १ लाख १५ हजार रुपयांची रक्कम अन्य महिलेच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. त्यामुळे हा निधी नेमका कोणत्या प्रक्रियेतून आणि कोणाच्या खात्यावर वर्ग झाला, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर आशा जमदाडे यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार विचारणा करून संबंधित रक्कम आपल्या खात्यावर वर्ग करण्याची मागणी केली. रक्कम चुकीने दुसऱ्या महिलेच्या खात्यावर जमा झाल्याची कबुली ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिल्याचा दावा जमदाडे यांनी केला आहे. तसेच संबंधित महिलेने रक्कम परत केल्यानंतर ती रक्कम जमदाडे यांना देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, अद्यापही ही रक्कम त्यांना मिळालेली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. घरकुल मंजूर असताना अनुदानाचा निधी दुसऱ्याच खात्यावर जमा होण्याचा प्रकार गंभीर असल्याचे सांगत जमदाडे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. घरकुलाच्या अनुदानाची संपूर्ण प्रक्रिया, लाभार्थ्याच्या बँक खात्याची नोंद आणि निधी वर्ग करण्याची कार्यवाही यांची तातडीने चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

चुकीच्या खात्यावर जमा झालेली १ लाख १५ हजार रुपयांची रक्कम वसूल करून पात्र लाभार्थी असलेल्या आपल्या खात्यावर तातडीने जमा करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन तातडीने कार्यवाही केली नाही, तर उपोषणास बसण्याचा इशारा आशा जमदाडे यांनी दिला आहे.

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसुली; छात्रभारतीकडून निषेध



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला असतानाही पुणे विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जात असल्याचा आरोप छात्रभारती विद्यार्थी संघटनेने केला आहे. शासनाच्या निर्णयाची विद्यापीठाकडून अंमलबजावणी होत नसल्याचा निषेध करत छात्रभारतीच्या वतीने सह्याद्री कॉलेज, संगमनेर येथे आंदोलन करण्यात आले.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, अनेक विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत शासनाने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतल्यानंतरही शुल्क वसूल केले जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असल्याचे संघटनेने म्हटले आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म दाखवत शुल्क वसुलीचा निषेध केला. शासनाने शुल्कमाफीचे परिपत्रक काढूनही त्याची अंमलबजावणी होत नसेल, तर या निर्णयाचा उपयोग काय, असा सवाल छात्रभारतीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेण्याचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, तसेच ज्या विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करण्यात आले आहे, त्यांची रक्कम परत करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांना दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेण्याबाबत स्पष्ट आदेश देण्याची मागणीही संघटनेने केली.

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना कागदावरील निर्णय नव्हे तर प्रत्यक्ष दिलासा मिळावा, अशी भूमिका छात्रभारतीने मांडली.

## वाढदिवसाचा अनोखा संकल्प

# मुलांच्या शिक्षणासाठी इंजिनीयर वडिलांकडून मुलाच्या वाढदिवसानिमिता आधार फाउंडेशनला भरीव देणगी



संगमनेर : मुलाचा वाढदिवस म्हणजे आनंदाचा आणि उत्सवाचा दिवस. मात्र याच आनंदाला सामाजिक बांधिलकीची जोड देत इंजिनीयर विकास रामनाथ कडलग यांनी आपल्या मुलगा विराजच्या २६व्या वाढदिवसानिमित्त आधार फाउंडेशनच्या 'आधार भवन' प्रकल्पासाठी २१ हजार रुपयांची ऑनलाइन देणगी देत वाढदिवसाचा अनोखा संकल्प जपला.

आधार फाउंडेशनचे समन्वयक डॉ. महादेव अरगडे यांच्या माध्यमातून आधारचे शिलेदार इंजि. विकास कडलग यांनी ही मदत केली. निराधार विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कार्यरत असलेल्या संस्थेला वाढदिवसाचे औचित्य साधून मदत करण्याचा त्यांचा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला आहे. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च करण्याऐवजी एखाद्या गरजू विद्यार्थ्याच्या शिक्षणाला हातभार लागावा, या भावनेतून कडलग यांनी देणगी देण्याचा निर्णय घेतला. 'आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने कोणाचे तरी शिक्षण पूर्ण होण्यास हातभार लागतोय', ही जाणीव विराजच्या मनात लहानपणापासून निर्माण व्हावी आणि त्याच्यात दया, सहानुभूती व दातृत्वाची भावना रुजावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे कडलग यांनी सांगितले. स्वत:चा आनंद इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्यासाठी वापरण्याची ही भूमिका समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. एका कुटुंबाचा वाढदिवसाचा आनंद निराधार विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयोगी पडत असल्याने या उपक्रमातून 'वाढदिवस साजरा करा, पण त्याला सामाजिक योगदानाची जोड द्या' असा संदेशही देण्यात आला. आधार फाउंडेशनच्या वतीने विराज कडलग याला वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# माजी मंत्री थोरात यांच्या हस्ते अशोक शेटे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

## मातीचा कपाळकरंटा कादंबरी व 'चला माणूस होऊया...कवितासंग्रहाचे रविवारी प्रकाशन







युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : ग्रामीण जीवनातील वास्तव आणि मानवी संवेदनांना शब्दरूप देणारे शिक्षक व लेखक अशोक शेटे यांच्या 'मातीचा कपाळकरंटा' या कादंबरीचा आणि 'चला माणूस होऊया' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. सह्याद्री कॉलेजच्या के. बी. दादा हॉलमध्ये सायंकाळी ४ ते ६ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे.

शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यात लोकनेते व माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विधान परिषदेचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे आणि पुणे येथील उद्योजक रोहित डुबे यांच्या शुभहस्ते पुस्तकांचे प्रकाशन होईल. संगमनेरच्या माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, साहित्यिक व प्रसिद्ध व्याख्याते डॉ. संजय कळमकर, साहित्यिक डॉ.कैलास दौंड आणि प्रसिद्ध कवी शशिकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या प्रसिद्ध पुस्तकाचे प्रकाशक कॉ. प्रशांत आंबी यांनी 'मातीचा कपाळकरंटा' ही कादंबरी प्रकाशित केली आहे. कोलमडणारी ग्रामीण लग्नव्यवस्था, सुशिक्षित शेतकरी तरुणांच्या विवाहातील अडथळे आणि त्यांच्या स्वप्नांची होणारी घुसमट या कादंबरीत मांडण्यात आली आहे. मातीशी नातं जपणाऱ्या शेतकरी पुत्रांच्या वेदना आणि संघर्षातून ही साहित्यकृती बदलत्या सामाजिक वास्तवाकडे लक्ष वेधते.

'चला माणूस होऊया' या कवितासंग्रहातून माणुसकी, नात्यांतील जिव्हाळा आणि सामाजिक संवेदनशीलता जपण्याचा संदेश देण्यात आला आहे. शिक्षक, लेखक, समीक्षक व मुक्त पत्रकार म्हणून कार्यरत असलेल्या अशोक शेटे यांच्या या दोन्ही पुस्तकांतून ग्रामीण जीवन आणि मानवी मूल्यांचा वेध घेण्यात आला आहे.

या प्रकाशन सोहळ्यास परिसरातील सर्व साहित्यप्रेमींनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने बाबा खरात, बाळासाहेब वाघ, सोमनाथ गोडसे,आर.पी राहणे व डॉ. संजय गोर्डे यांनी केले आहे.

# शारदा शिक्षण संस्थेतील ३२ शिक्षकांनी घेतले लायन्स क्वेस्ट प्रशिक्षण

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आधुनिक अध्यापन पद्धतींचे मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धतींचे ज्ञान, कौशल्ये आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक दृष्टिकोन मिळणे आवश्यक आहे. याच उद्देशाने लायन्स क्लब सॅफ्रॉन सफायर यांच्यावतीने शारदा शिक्षण संस्थेच्या मातोश्री रू. दा. मालपाणी विद्यालय प्राथमिक व माध्यमिक विभागातील ३२ शिक्षकांसाठी संगमनेर येथील मालपाणी रिसोर्ट येथे दोन दिवसीय लायन्स क्वेस्ट प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांना आधुनिक शिक्षणपद्धती, विद्यार्थ्यांचे समुपदेशन, कृतीयुक्त अध्ययन आणि विद्यार्थिकेंद्रित अध्यापन याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन शारदा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी यांच्या हस्ते करण्यात आले.

गिरीश मालपाणी व सुनीता मालपाणी यांनी पुढाकार घेऊन संस्थेतील शिक्षकांना या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षणात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी आणि शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

या प्रसंगी प्रदीप कुलकर्णी, राजकुमार आनंद व सौ. नीरा आनंद, प्रमुख प्रशिक्षक बी. एल. जोशी,जितेश लोढा (अध्यक्ष लायन्स सॅफ्रॉन), संस्थेचे सेक्रेटरी सतीशजी लाहोटी तसेच लायन्स क्लबचे सर्व सदस्य उपस्थित होते.

प्रशिक्षणादरम्यान प्रमुख प्रशिक्षक बी. एल. जोशी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणक्षेत्रात होत असलेले बदल आणि त्यानुसार शिक्षकांची बदलती भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पारंपरिक अध्यापन पद्धतींसोबतच विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेत सक्रिय सहभागी करून घेणाऱ्या नाविन्यपूर्ण पद्धतींचा प्रभावी वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकांसह विवेचन करण्यात आले.

विद्यार्थ्यांचे समुपदेशन, त्यांच्या भावनिक व सामाजिक गरजा समजून घेणे, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची प्रभावी पद्धत, तसेच पालकांशी समन्वय साधण्यासाठी पालक मेळाव्यांचे नियोजन व आयोजन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय अभ्यासपूरक कृतीयुक्त उपक्रम, विविध शैक्षणिक खेळ, गटकार्य, सहभागाधारित अध्ययन आणि कमी खर्चात प्रभावी शैक्षणिक साधनांची निर्मिती यांविषयी शिक्षकांना उपयुक्त माहिती देण्यात आली.

या दोन दिवसीय प्रशिक्षणात सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदविला. विविध कृती, शैक्षणिक खेळ आणि चर्चांच्या माध्यमातून शिक्षकांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. प्रशिक्षणातील विषयांचा आपल्या दैनंदिन अध्यापनात कसा उपयोग करता येईल, याविषयी शिक्षकांनी विचारमंथन केले. सहभागी शिक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया आणि सकारात्मक अभिप्राय हे या प्रशिक्षणाच्या यशाचे महत्त्वपूर्ण द्योतक ठरले. प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी गिरीश मालपाणी यांनी उपस्थित शिक्षकांना अनमोल मार्गदर्शन केले. शिक्षकांनी सतत नवनवीन गोष्टी शिकत राहावे, बदलत्या शैक्षणिक प्रवाहांशी स्वत:ला जोडून घ्यावे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा प्रभावी वापर करावा, अशा आशयाचे मार्गदर्शन त्यांनी केले.

या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व शिक्षकांना लायन्स क्वेस्ट फाउंडेशनच्या वतीने निर्मित मौल्यवान शैक्षणिक पुस्तकांचा संच भेट देण्यात आला. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सर्व सहभागी शिक्षकांना प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.

# निसर्ग पर्यटनातून रोजगारनिर्मिती

## लाभार्थ्यांना डबल सीट सायकलींचे वाटप



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- दऱ्याखोऱ्यांतून वाहणारे वारे..आणि कोकणकड्यावर उभे राहिले की क्षितिजापलीकडे हरवून जाणारे मन. हा निसर्ग केवळ पाहण्यासाठी नाही, तर जपण्यासाठी आणि त्याच्यासोबत जगण्यासाठी आहे. याच निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या स्थानिकांच्या जीवनात रोजगाराची नवी पहाट यावी, या भावनेतून वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून घाटघर-कोकणकडा परिसरातील गरजू स्थानिक लाभार्थ्यांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत डबल सीट सायकलींचे वितरण कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागाद्वारे करण्यात आले.

सौंदर्याच्या साक्षीदार असलेल्या स्थानिकांच्या जीवनातही कळसुबाई हरिश्चंद्र गड अभयारण्य उपवनसंरक्षक कृष्णा भवर सहाय्यक वन संरक्षक अनिल पवार, वनपरिक्षेत्राधिकारी रुपेश गावित वन परिमंडळ अधिकारी अनिल साळवे व वनरक्षक महेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे-घाटघर येथे वन्यजीव सप्ताह निमित्त स्थानिक गरजू लोकांना रोजगार निर्माण व्हावा या करता घाटघर कोकणकडा येथे ९ लाभार्थी यांना डबल सीट बायसिकल सायकल वाटप करण्यात आली पर्यटनात एक रोजगाराची नवीन संधी उपलब्ध करण्यात आली. त्याप्रसंगी मौजे घाटघर येथील उद्घाटन प्रसंगी सरपंच एकनाथ खडके, समाजसेवक देविदास खडके ग्रामस्थ, लाभार्थी, राजुर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिभा सोनवणे वनपाल शंकर लांडे, प्रवीण गांगुर्डे उपस्थित होते.

# संपादकीय...

## स्पर्धा परीक्षांचे स्वप्न की मानसिक तणावाचा प्रवास...

महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या डोळ्यांत सरकारी नोकरीचे स्वप्न आहे. हातात पदवी, मनात अधिकारी होण्याची महत्त्वाकांक्षा आणि कुटुंबाच्या अपेक्षांचे ओझे घेऊन हजारो विद्यार्थी पुणे, मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांकडे धाव घेतात. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वर्षानुवर्षे अभ्यास करतात. दिवस-रात्र एक करतात. मात्र या प्रवासात एक प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे-ही स्पर्धा तरुणांना त्यांच्या स्वप्नाच्या दिशेने घेऊन जात आहे की मानसिक तणावाच्या गर्तेत ढकलत आहे?स्पर्धा परीक्षा स्वतःमध्ये चुकीच्या नाहीत. उलट, गुणवत्तेच्या आधारावर प्रशासनात येण्याची संधी त्या उपलब्ध करून देतात. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील विद्यार्थीही अभ्यासाच्या जोरावर मोठ्या पदावर पोहोचू शकतो, ही या परीक्षांची सर्वात मोठी ताकद आहे. अनेक विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवले आहे. त्यांच्या कथा आजही लाखो तरुणांना प्रेरणा देतात. परंतु या यशोगाथांच्या मागे अपयश, प्रतीक्षा, अनिश्चितता आणि मानसिक संघर्षाची जी मोठी दुनिया आहे, तिच्याकडे समाजाचे पुरेसे लक्ष जात नाही.

एका पदासाठी हजारो उमेदवार आणि मर्यादित जागा, हे स्पर्धा परीक्षांचे वास्तव आहे. विद्यार्थी दोन-तीन वर्षे नव्हे तर पाच-पाच, सहा-सहा वर्षे तयारी करतात. एक परीक्षा पुढे ढकलली जाते, निकाल लांबतो, भरती प्रक्रिया रखडते, कधी अभ्यासक्रम बदलतो, तर कधी परीक्षा पद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. या प्रत्येक घटनेचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर होतो. वय वाढत जाते, मित्र नोकरीला लागतात, काहींची लग्ने होतात, काही परदेशात जातात; आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी मात्र पुन्हा त्याच पुस्तकांसमोर बसलेला असतो. यात भर पडते ती कुटुंबाच्या अपेक्षांची. तू अधिकारी होणार ना?, कधी लागणार नोकरी?, अमुकचा मुलगा लागला, तुझं काय? असे प्रश्न विद्यार्थ्याच्या आत्मविश्वासाला हळूहळू पोखरू शकतात. सुरुवातीला प्रेरणा देणारी अपेक्षा नंतर दबाव बनते. अपयश आले की विद्यार्थ्याला वाटू लागते की आपण कुटुंबाची निराशा केली. ही भावना धोकादायक आहे. आज सोशल मीडियाने या स्पर्धेला आणखी एक वेगळे रूप दिले आहे. एखाद्या विद्यार्थ्याच्या यशाची पोस्ट काही मिनिटांत हजारो लोकांपर्यंत पोहोचते. पहिल्याच प्रयत्नात यश, दिवसाला १६ तास अभ्यास, गरिबीवर मात करून अधिकारी अशा कथा प्रेरणा देतात; पण त्याच वेळी अनेक विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंडही निर्माण करतात. आपण मागे पडतोय का? आपण पुरेसा अभ्यास करत नाही का? आपल्यात क्षमता नाही का? असे प्रश्न सतत डोक्यात घोंघावत राहतात. विशेष म्हणजे, स्पर्धा परीक्षांच्या तयारीत विद्यार्थ्यांचे संपूर्ण आयुष्य एका परीक्षेच्या निकालाशी जोडले जाते. यश मिळाले तर जीवन यशस्वी आणि अपयश आले तर आपण अपयशी-अशी चुकीची मानसिकता निर्माण होते. पण परीक्षेत अपयश म्हणजे आयुष्यात अपयश नव्हे. हा साधा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. या परिस्थितीत शिक्षणसंस्था, कोचिंग क्लासेस, पालक आणि सरकार यांचीही भूमिका महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासाचे मार्गदर्शन देणे पुरेसे नाही; त्यांना मानसिक आरोग्य, वेळेचे नियोजन, अपयश स्वीकारण्याची क्षमता आणि पर्यायी करिअरच्या संधी याबाबतही मार्गदर्शन मिळायला हवे. प्रत्येक विद्यार्थ्याने एका परीक्षेवर आपले संपूर्ण भविष्य अवलंबून ठेवू नये. सरकारच्या पातळीवरही परीक्षा आणि भरती प्रक्रियेत सातत्य, पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन आवश्यक आहे. परीक्षा वारंवार पुढे ढकलणे, निकालाला विलंब होणे किंवा भरती प्रक्रिया दीर्घकाळ प्रलंबित राहणे, याचा थेट परिणाम उमेदवारांच्या वयावर आणि मानसिक स्थितीवर होतो. तरुणांनी अभ्यास करावा, पण व्यवस्थेनेही त्यांचा वेळ आणि संयम यांचा आदर करावा. पालकांनीही मुलांच्या गुणांपेक्षा त्यांच्या मानसिक स्थितीकडे लक्ष देण्याची गरज आहे. किती तास अभ्यास केला? या प्रश्नापेक्षा तुला कसं वाटतंय? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरू शकतो. अपयशानंतर मुलाला दोष देण्याऐवजी त्याच्यासोबत उभे राहणे हीच खरी पालकांची भूमिका आहे. समाजानेही सरकारी नोकरीला यशाचे एकमेव प्रमाण मानणे थांबवले पाहिजे. व्यवसाय, उद्योग, शेती, खासगी क्षेत्र, तंत्रज्ञान, संशोधन, कला, क्रीडा अशा असंख्य क्षेत्रांतही उत्तम करिअरच्या संधी आहेत. सरकारी नोकरी प्रतिष्ठेची असू शकते; पण तीच प्रतिष्ठेची एकमेव वाट नाही. आजच्या तरुणांना स्पर्धा हवी आहे, पण अस्वस्थ करणारी स्पर्धा नको. त्यांना संधी हवी आहे, पण अनिश्चिततेत वर्षानुवर्षे अडकून राहण्याची वेळ नको. त्यांना यश हवे आहे, पण अपयश आले तरी पुन्हा उभे राहण्याची मानसिक ताकदही हवी

# विशेष मुलांच्या दैनंदिन सोयीसाठी इनर व्हील क्लबचा मदतीचा हात, वॉशिंग मशीन भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समाजातील गरजू, वंचित तसेच विशेष घटकांसाठी सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या इनर व्हील क्लब ऑफ नाशिक आणि इनर व्हील क्लब ऑफ संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर येथील डॉ. देवेंद्र ओहरा मतिमंद विद्यालय व संग्राम मूकबधिर विद्यालयास अत्याधुनिक वॉशिंग मशीन सप्रेम भेट देण्यात आले.

थोरात-तांबे परिवाराच्या स्नेही व नाशिक येथील प्रसिद्ध डॉ. ज्योत्स्नाताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. इनर व्हील क्लब ऑफ नाशिकच्या माजी अध्यक्षा डॉ. ज्योत्स्नाताई पवार यांनी सामाजिक उपक्रमासाठी आपल्या वैयक्तिक देणगीतून २१ हजार रुपये दिले. ही रक्कम इनर व्हील क्लब ऑफ नाशिकच्या माध्यमातून देण्यात आली. त्यात इनर व्हील क्लब ऑफ संगमनेरने ६ हजार रुपयांची भर घातल्याने एकूण २७ हजार रुपयांच्या निधीतून वॉशिंग मशीन खरेदी करून दोन्ही विशेष शाळांना भेट देण्यात आले.

या वॉशिंग मशीनमुळे विद्यालयातील विशेष विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वापरातील कपडे धुण्यासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार असून, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताणही कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रसंगी संग्राम संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुधीर तांबे व सचिव डॉ. नामदेवराव गुंजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते वॉशिंग मशीन विद्यालयीन प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आले.

यावेळी इनर व्हील क्लब ऑफ नाशिकच्या अध्यक्षा अलका फाटगरे, सचिव स्नेहल पुळी, खजिनदार कल्पना महाजन, डॉ. ज्योत्स्ना पवार, कल्पना माळोदे, वैशाली टिळे, विरमती पाटील, प्रज्ञा गोखले, गरिमा फाटगंरे, साधना रत्नपारखी व भाविका चंदे आदी सदस्य उपस्थित होते.

तसेच इनर व्हील क्लब ऑफ संगमनेरच्या अध्यक्षा वैशाली चोपडे, सचिव अश्विनी ढोले आणि क्लब सदस्या कोमल उगले यांनी उपक्रमाच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य चांगदेव खेमनर, प्राचार्य सुनील कवडे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

विशेष विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या संवेदनशील उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. सामाजिक बांधिलकी जपत विशेष मुलांसाठी सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या इनर व्हील क्लब ऑफ नाशिक व संगमनेरच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासकीय योजनांचा लाभ प्राधान्याने द्यावा - आ. डॉ. लहामटे



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने अधिक गतिमान आणि लोकाभिमुख होण्याची गरज आहे. नागरिकांना शासकीय सेवांसाठी वारंवार शासकीय कार्यालयांमध्ये यावे लागू नये. यासाठी सर्व शासकीय योजना लाभ प्राधान्याने व लोकाभिमुख होऊन एकाच ठिकाणी उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन अकोले मतदार संघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले.

सेवा संकल्प अभियाना अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर, व राणी दुर्गावती जयंती निमित्त आदिवासी महिला बचत गट मेळावा व शासकीय सेवा शिबिर राजूर येथील अक्षय साई लॉन्स येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रकल्प अधिकारी राजूर येथील देवकन्या बोकडे अकोले तहसीलदार सिद्धांत मोरे, गटविकास अधिकारी अमर माने, महिला व बालविकास अधिकारी केदार नांगरे ,वनपरिक्षेत्र अधिकारी दत्तात्रय पडवळ प्रतिभा सोनवणे, कृषी अधिकारी, अतुल पवार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी मनोज पैठणकर, तुषार पवार, योगेश ढोणे, दीपक कालेकर, संजय सुसलादे लेखा अधिकारी व प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी वृंद उपस्थित होते.

राज्य शासनामार्फत दि. १७ सप्टेंबर ते दि. १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान २०२६ राबविण्यात येत आहे. शासनाच्या योजनाचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावा, तसेच नागरिकांच्या अडचणींचे स्थानिक पातळीवर निराकरण व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

आदिवासी मेळावा व शासकीय सेवा शिबिरात सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनहक्क अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२ च्या प्रभावी अंमलबजावणी अंतर्गत ७ ई आणि १२ ई चे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. महसूल विभागामार्फत जातीचे दाखले, उत्पन्न व रहिवासी दाखले, आधार सेवा, वनहक्क आदिवासी महिला बचत गटांच्या सबलीकरणासाठी उपलब्ध योजनांची माहिती देण्यात येऊन प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

या शिबिरात नागरिकांनी विविध समस्या व मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नाबाबत मार्गदर्शन केले. एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला.

# पान २ वरून - जलजीवन गैरव्यवहारप्रकरणी...

प्रशासनाच्या वरिष्ठ स्तरावरून योग्य देखरेख झाली असती, तर अशा प्रकारच्या अनियमितता घडल्या नसत्या, असा आरोपही त्यांनी केला.

जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात तब्बल ८३० योजना राबविण्यात आल्या. यातील अनेक कामे अद्याप अपूर्ण असतानाही कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याचे दाखवून बिले काढण्यात आल्याचा गंभीर आरोप दहातोंडे यांनी केला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, दहातोंडे यांनी केलेल्या तक्रारीनंतर या प्रकरणाकडे राज्य शासनाचे लक्ष लागले असून, तत्कालीन सीईओंच्या भूमिकेबाबत शासन काय निर्णय घेते, याकडे अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५
२२५१२९


युवावार्ता
छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

पाहिजेत
ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वतःचे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

पाहिजेत
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर
कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

लोकपंचायत
जुने वाहन विक्रीसाठी सीलबंद निविदा आमंत्रण
लोकपंचायत संस्थेच्या मालकीचे खालील वाहन जसे आहे तसे व जिथे आहे तिथे या तत्त्वावर विक्रीस उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्ती/संस्था/वाहन विक्रेत्यांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वाहानाचा तपशील | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|
| 1 | टाटा सुमो गोल्ड CX 9 STR B, 2012 डिझेल, आसन क्षमता 9 | MH-17-AJ-4150 |

अटी व शर्ती
1. वाहनाची पाहणी कार्यालयीन वेळेत करता येईल
२. सीलबंद लिफाफ्यावर टाटा सुमो MH-17-AJ-4150 खरेदी निविदा असे स्पष्ट नमूद करावे
३. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख - 15-10-2026
4. निविदा सादर करण्याचा पत्ता - लोकपंचायत ग्रामीण तंत्र शिक्षण संस्था, मु. कुरकुंडी, पो. घारघाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२६२०
५. कोणतीही अथवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थेकडे राखीव राहील.
अधिकृत स्वाक्षरी
लोकपंचायत




पाहिजेत
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
( सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
RIZWAN AHMED SHAIKH
NEW NAME AS
RIZWAN GULAM JILANI SHAIKH
ADD - MOMINPURA, NEAR KACHERI SANGAMNER, TAL - SANGAMNER DIST- AHMEDNAGAR

CHANGE IN NAME
I HAVE CHANGE MY OLD NAME
HASE ASHWINI DATTATRAYA
(AS PER 10TH BOARD CERTIFICATE)
TO NEW NAME AS
HASE ASHWINI DATTATRAY
(AADHAR NO. 9439 2790 0242)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC
RAJAPUR, TAL- SANGAMNER
DATE: 6-10-2026

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य )
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ अॅण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

पाहिजेत
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

20 गुंठे जागा भाडे तत्त्वावर देणे आहे
नूतन माध्यमिक विद्यालया पुढे, राजापूर, तालुका- संगमनेर. जिल्हा अहिल्यानगर.
7798616908

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

जागा भरणे आहे
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431

पाहिजेत
नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरपिस्ट
पुरूष–१/ स्त्री –१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

पाहिजेत
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096






आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी विक्रमी ३६९ अर्ज!

## बिनविरोध की निवडणूक? माघारीनंतर चित्र होणार स्पष्ट



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २१ जागांसाठी तब्बल ३६९ उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीत चांगलीच रंगत निर्माण झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सोमवारी अंतिम मुदत होती. विशेष म्हणजे उमेदवारीसाठी तब्बल ९०३ अर्जांची विक्री झाल्याने इच्छुकांची संख्या मोठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता अर्जांची छानणी आणि माघारीनंतर बिनविरोधाचा मार्ग मोकळा होतो की प्रत्यक्ष निवडणुकीचा धुरळा उडतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी जिल्ह्यातील विविध राजकीय पक्ष, गट आणि सहकार क्षेत्रातील नेत्यांनी मोठे शक्तिप्रदर्शन केले. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणूक कार्यालय परिसरात दिवसभर इच्छुक उमेदवार, समर्थक आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती. समर्थकांकडून घोषणाबाजी आणि फलकबाजी करण्यात आल्याने परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते.

अंतिम दिवशी माजी खासदार डॉ. सुजय विखे, आमदार मोनिका राजळे, आमदार अक्षय कर्डिले, माजी मंत्री शंकरराव गडाख, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप, माजी मंत्री बबनराव पाचपुते यांचे चिरंजीव प्रताप पाचपुते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजीतसिंह देशमुख, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य हर्षदा काकडे, माजी खासदार सदाशिव लोखंडे यांचे चिरंजीव प्रशांत लोखंडे, देवळाली प्रवरा नगराध्यक्ष सत्यजित कदम, माजी आमदार भानुदास मुरकुटे व त्यांचे नातू नीरज मुरकुटे, माजी संचालक अमित भांगरे, शिवसेना (शिंदे गट)चे अरुण मुंडे आणि ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार यांच्यासह अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

तर खासदार निलेश लंके, आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार आशुतोष काळे, आमदार विवेक कोल्हे, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार चंद्रशेखर घुले आणि माजी आमदार वैभव पिचड यांनी यापूर्वीच उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

जिल्हा बँकेच्या विविध मतदारसंघांमध्येही उमेदवारीसाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळाली. महिला मतदारसंघातून सर्वाधिक ६३ अर्ज दाखल झाले असून या मतदारसंघातून दोन संचालक निवडले जाणार आहेत. विशेष म्हणजे अनेक राजकीय पदाधिकाऱ्यांच्या पत्नींनीही या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या मतदारसंघातील लढत विशेष लक्षवेधी ठरण्याची शक्यता आहे.

दाखल झालेल्या अर्जांची आता छाननी होणार असून त्यानंतर माघारीची प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे सध्या ३६९ उमेदवार मैदानात दिसत असले तरी प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात किती उमेदवार राहतात, हे माघारीनंतरच स्पष्ट होणार आहे. विविध राजकीय गटांकडून बिनविरोध निवडीसाठी प्रयत्न होणार की प्रत्येक मतदारसंघात थेट सामना रंगणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे काम पाहत असून तालुका निबंधक रावसाहेब खेडकर आणि देविदास घोडेचोर हे त्यांना सहाय्य करीत आहेत.

३६९ अर्जांमुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीची सुरुवातच चुरशीने झाली असून, माघारीनंतर कोण कोणासोबत, कोणाच्या विरोधात आणि कोणत्या मतदारसंघात थेट लढत होणार, याचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या सत्तेची चावी नेमकी कोणाच्या हाती जाणार, याकडे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### कोणत्या मतदारसंघात किती अर्ज?

**प्राथमिक सेवा संस्था मतदारसंघात अकोला १९, जामखेड ६, कर्जत १३, कोपरगाव ६, नगर ६, नेवासा ४, पारनेर १०, पाथर्डी ६, राहाता ६, राहुरी ७, संगमनेर ४, शेवगाव ४, श्रीगोंदा १६ आणि श्रीरामपूर ५ अर्ज दाखल झाले आहेत. याशिवाय शेतीपूरक मतदारसंघातून ३६, बिगरशेती ५४, महिला ६३, अनुसूचित जाती–जमाती २५, ओबीसी ५३ आणि विजाभज–विशेष मागास प्रवर्गातून २६ अर्ज दाखल झाले आहेत.**

# दूध संघाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देत देशमुखांची जिल्हा बँक निवडणूकीत एन्ट्री



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देत विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.

रणजितसिंह देशमुख हे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई असून, सहकार क्षेत्रातील त्यांच्या अनुभवामुळे त्यांच्या उमेदवारीकडे विशेष लक्ष लागले आहे. जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी थोरात यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीला माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचीही उपस्थिती होती. त्यामुळे थोरात-विखे यांच्यातील बैठकीनंतर जिल्हा बँकेतील राजकीय समीकरणांबाबत चर्चेला उधाण आले आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचाली सुरू असतानाच अध्यक्षपदाची जबाबदारी कोणाकडे जाणार, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. देशमुख यांच्या उमेदवारीमुळे अध्यक्षपदाच्या चर्चेलाही नवे वळण मिळाले आहे. दरम्यान, जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी तब्बल ३६९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी स्वतः अर्ज न भरता आपले जावई रणजीत देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. ऐनवेळी घेतलेल्या या निर्णयाकडे राजकीय वर्तुळातून 'मास्टरस्ट्रोक' म्हणून पाहिले जात आहे.

पान १ वरून

## दिल्लीतील...

आज मोर्चा काढल बीजू जनता दलची अनपेक्षित साथ- या आंदोलनाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे आतापर्यंत तटस्थ भूमिका घेणारा नवीन पटनायक यांचा 'बीजू जनता दल' पक्षही या विरोधात सामील झाला. बीजेडी प्रमुख नवीन पटनायक यांनी आधीच 'एसआयआर' प्रकरणाला कडाडून विरोध केला होता. त्यांच्या पक्षाच्या खासदारांनीही या मोर्चात सहभाग घेतला..२ बड्या नेत्याचं तिकिट कापले, आता मंत्रिमंडळातूनही पत्ता कट, मोदी कॅबिनेटमध्ये ४ नव्या मंत्र्यांची एन्ट्री होणार? नीती आयोगाच्या दफ्तरासमोर पोलिसांची नाकेबंदीविरोधी पक्षाचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जात असताना, नीती आयोगाच्या इमारतीसमोर सुरक्षा दलांनी त्यांना रोखले. यावेळी खासदारांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. जोपर्यंत ज्ञानेश कुमार आपल्या पदाचा राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत हा लढा चालूच राहील, असा इशारा विरोधकांनी दिला आहे..

नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर भरपाई

## आमदार अमोल खताळ यांचे सरसकट पंचनाम्याचे अधिकाऱ्यांना निर्देश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -तालुक्यातील साकूर पठार भागातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांची आमदार अमोल खताळ यांनी गुरुवारी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेत एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

हिवरगाव पठार अंतर्गत सुतारवाडी, पायरवाडी, कोठे मल्हापूर, कुंभारवाडी, जांभुळवाडी तसेच पिंपळगाव देपा परिसरातील शेतांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची आमदार खताळ यांनी पाहणी केली. अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पिके पावसामुळे उद्ध्वस्त झाल्याचे यावेळी निदर्शनास आले.

नुकसानभरपाईच्या पंचनाम्यात कोणताही भेदभाव खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत आमदार खताळ यांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना नुकसानग्रस्त पिकांचे सरसकट व तातडीने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. प्रत्यक्ष शेतावर जाऊन वस्तुनिष्ठ पाहणी करून नुकसानाची नोंद करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनस्तरावर तातडीने पाठपुरावा करण्यात येईल. दिवाळीपूर्वी नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आमदार खताळ यांनी सांगितले. अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाची मदत वेळेत मिळावी, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष बांधावर येऊन पाहणी केल्याबद्दल आमदार खताळ यांच्याकडे आपल्या अडचणी मांडल्या. नुकसानाची योग्य नोंद होऊन भरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी तहसीलदार धीरज मांडे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, तालुका कृषी अधिकारी रजा बोडके, भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष रुस्तुम शेख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रणजित ढेंगे आदी उपस्थित होते.

चैतन्य हॉस्पिटल

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 - 224761, मोबा. 7038170382



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी



आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज

बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

SMBT BANK

* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे

सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा

- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

दर्शन
टेक्सटाईल मार्केट



सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist



डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

# सहकारातील ज्येष्ठ नेते कै. निवृत्ती यशवंत लांडगे यांना भावपूर्ण श्रध्दांजली !

## आठवणींच्या रूपाने सदैव सोबत राहणारे व्यक्तिमत्त्व

**– डॉ. संतोष लांडगे, वडगाव लांडगा**

कैलासवासी निवृत्ती यशवंत लांडगे हे माझ्यासाठी केवळ कुटुंबातील एक व्यक्ती नव्हते, तर ते माझे प्रेमळ काका, आयुष्याच्या वाटेवर योग्य दिशा दाखविणारे मार्गदर्शक आणि सुख-दुःखात मनापासून साथ देणारे जिव्हाळ्याचे मित्र होते. त्यांचा सहवास हा माझ्या आयुष्यातील एक अनमोल ठेवा आहे. पुतण्या म्हणून त्यांच्या सान्निध्यातून मला माणुसकी, प्रामाणिकपणा, निष्ठा, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी यांचे मौल्यवान संस्कार लाभले.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी स्वतःची एक वेगळी आणि आदराची ओळख निर्माण केली. आपल्या विचारांशी ठाम राहूनही माणसांशी असलेले नाते त्यांनी कधीही तुटू दिले नाही. मतभेद असले तरी मनभेद न ठेवता प्रत्येकाशी आपुलकीने आणि सन्मानाने वागणे, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठा गुण होता. समाजातील सर्वसामान्य माणसाशी त्यांनी जोडलेली नाळ त्यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देत होती.

निवृत्ती काकांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे साधेपणा, स्पष्टवक्तेपणा आणि माणुसकीचा सुंदर संगम होता. त्यांच्या बोलण्यात आपलेपणा होता, वागण्यात प्रेम होते आणि मनात प्रत्येकासाठी जागा होती. एखाद्याच्या अडचणीच्या काळात त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आणि सुखाच्या क्षणी मनापासून आनंदात सहभागी होणे, ही त्यांची सहज वृत्ती होती.

मैत्रीचे नाते त्यांनी अत्यंत मनापासून जपले. एकदा एखाद्या व्यक्तीशी नाते जोडले की ते आयुष्यभर टिकविण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळेच त्यांना भेटलेल्या प्रत्येकाच्या मनात त्यांच्या आठवणींचा एक वेगळा कोपरा आजही जिवंत आहे. आज नियतीने त्यांना आपल्यापासून दूर नेले आहे. त्यांच्या जाण्याची पोकळी कधीही भरून निघणारी नाही. काळ पुढे सरकेल, दिवस जातील; मात्र त्यांचा प्रेमळ आवाज, आपुलकीचे शब्द, दिलेले मार्गदर्शन आणि मायेची सावली सदैव स्मरणात राहील.

काका म्हणून लाभलेला त्यांचा प्रेमळ सहवास आणि पुतण्या म्हणून त्यांच्या हातून मिळालेले संस्कार व मार्गदर्शन ही माझ्या आयुष्याची अमूल्य संपत्ती आहे. ते आज देहाने आपल्यात नसले, तरी त्यांनी दिलेले विचार, संस्कार आणि त्यांनी जपलेली माणुसकीची नाती यांच्या रूपाने ते सदैव आपल्या सोबत राहतील. माणसं जातात, पण त्यांचे प्रेम, विचार आणि आठवणी कधीच जात नाहीत. निवृत्ती काकांचेही असेच आहे. त्यांच्या स्मृती आमच्या हृदयात सदैव जिवंत राहतील आणि त्यांच्या आठवणींचा सुगंध आयुष्यभर मनाला स्पर्श करत राहील. कैलासवासी निवृत्ती यशवंत लांडगे यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! भावपूर्ण श्रद्धांजली!

## आठवणींच्या रूपाने सदैव सोबत राहणारे निवृत्ती लांडगे...



कैलासवासी निवृत्ती यशवंत लांडगे हे माझ्यासाठी केवळ एक मित्र नव्हते, तर सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी खंबीरपणे पाठीशी उभे राहणारे जिवलग स्नेही, विश्वासू सहकारी आणि आपुलकीचा आधार होते. त्यांच्या अकाली जाण्याने मनाला चटका लावणारी पोकळी निर्माण झाली आहे. ही उणीव कधीही भरून निघणारी नाही. माझ्या सरपंचपदाच्या कार्यकाळात त्यांनी मला दिलेले मार्गदर्शन, सहकार्य आणि विश्वास माझ्या कायम स्मरणात राहील. गावाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविताना त्यांनी वेळोवेळी दिलेली साथ, योग्य वेळी केलेले मार्गदर्शन आणि मनापासून दिलेले प्रोत्साहन हे माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरले. कोणतेही काम असो, अडचणीच्या प्रसंगी मदतीचा हात पुढे करण्याची त्यांची वृत्ती नेहमीच भावणारी होती.

निवृत्ती लांडगे यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू, प्रेमळ, प्रामाणिक आणि मदतीचा होता. त्यांच्या बोलण्यात आपलेपणा, वागण्यात साधेपणा आणि मनात माणुसकी होती. राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करताना अनेक व्यक्तींशी त्यांचे ऋणानुबंध निर्माण झाले; मात्र प्रत्येक नाते जपण्याची आणि मैत्रीला शेवटपर्यंत प्रामाणिकपणे निभावण्याची त्यांची वृत्ती विशेष होती.

आज ते आपल्यात प्रत्यक्ष नसले तरी त्यांच्या आठवणी, त्यांनी दिलेले प्रेम, आपुलकीचे शब्द, मार्गदर्शन आणि सहकार्य कायम आपल्या मनात जिवंत राहील. काही माणसे आयुष्यातून निघून जातात; पण त्यांच्या आठवणी मनातून कधीच जात नाहीत. निवृत्ती लांडगे हेही असेच एक आपलेपण जपणारे व्यक्तिमत्त्व होते, ज्यांची उणीव प्रत्येक क्षणी जाणवत राहील.

त्यांच्या जाण्याने आम्ही एक जिवलग मित्र, विश्वासू सहकारी आणि आधार देणारे माणूस गमावले आहे. त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन! त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. निवृत्ती लांडगे यांच्या आठवणी सदैव हृदयात जिवंत राहतील...

भावपूर्ण श्रद्धांजली!

**भाऊसाहेब मुकिंदा लांडगे,**
**माजी सरपंच, वडगाव लांडगा**

## गावच्या विकासाला वाहून घेतलेले ब्वाजी

**– दत्तात्रय हरिचंद लांडगे**
**काँग्रेस पक्षाचे सहकारी मित्र**

काँग्रेस पक्षाचे सहकारी मित्र कै. निवृत्ती यशवंत लांडगे (बुवाजी नाना) यांच्या निधनाने एक निष्ठावान सहकारी, उत्तम संस्थाचालक आणि गावाच्या विकासासाठी सतत धडपडणारे व्यक्तिमत्त्व आपण गमावले आहे.

कै. बुवाजी नाना यांनी गावातील पहिली सहकारी हनुमान दूध संस्था स्थापन करण्यामध्ये मोलाची भूमिका बजावली. सहकार क्षेत्राची त्यांना असलेली जाण, प्रशासकीय कामकाजावरील मजबूत पकड आणि काम करताना सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची हातोटी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मोठी ताकद होती.

सोसायटीचे चेअरमन म्हणून सुमारे १५ वर्षे त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात संस्थेची उभारणी आणि विकासाला त्यांनी प्राधान्य दिले. सोसायटीची इमारत उभी करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. संस्थेचे कामकाज पारदर्शक आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हिताचे राहावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्यावर संचालक म्हणून काम करताना त्यांनी गावाच्या आणि शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. पद हे केवळ प्रतिष्ठेसाठी नसून त्याचा उपयोग सामान्य माणसाच्या हितासाठी झाला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती.

काँग्रेस पक्षाशी त्यांचे नाते केवळ राजकीय नव्हते, तर विचारांशी आणि कार्यकर्त्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते होते. पक्षाचे सहकारी म्हणून त्यांनी अनेक प्रसंगी खंबीरपणे साथ दिली. विशेष म्हणजे तरुण कार्यकर्त्यांना संधी देणे, त्यांच्यावर विश्वास ठेवणे आणि त्यांना पुढे आणणे हा त्यांच्या स्वभावाचा महत्त्वाचा गुण होता.

गावातील सामाजिक, सहकारी आणि सार्वजनिक जीवनात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. मतभेद असले तरी मनभेद न ठेवता सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची वृत्ती आजच्या पिढीसाठी निश्चितच आदर्श आहे.

बुवाजी नाना यांच्या निधनाने वडगाव लांडगा गावाने एक चांगला सहकारी, मार्गदर्शक आणि विकासाची तळमळ असलेला कार्यकर्ता गमावला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही.

कै. बुवाजी नाना यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!



## नाना, सासरे नव्हे...आधारस्तंभ

**– मोनाली संतोष लांडगे**
**ग्रामपंचायत सदस्य, वडगाव लांडगा**

कैलासवासी निवृत्ती यशवंत लांडगे हे माझ्यासाठी केवळ सासरे नव्हते, तर माझ्या आयुष्यातील एक खंबीर आधारस्तंभ, प्रेमळ मार्गदर्शक, हितचिंतक आणि विश्वासू सहकारी होते. सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी त्यांनी माझ्या पाठीशी उभे राहून मला धीर दिला, योग्य दिशा दाखवली आणि माझ्यावर निःस्वार्थ प्रेम केले.

माझ्या सामाजिक व राजकीय वाटचालीत त्यांचे योगदान शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. माझ्यावर त्यांनी ठेवलेला विश्वास हा माझ्यासाठी नेहमीच मोठी प्रेरणाशक्ती राहिला. एकाच वेळी दोन वॉर्डमधून ग्रामपंचायत सदस्य म्हणून मला विजयी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांचा दांडगा जनसंपर्क, सर्वांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध, प्रत्येक व्यक्तीशी आपुलकीने वागण्याची हातोटी आणि योग्य वेळी दिलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या विजयाचा मार्ग सुकर झाला. त्या विजयामागे माझे प्रयत्न होते; पण त्या प्रयत्नांना बळ देणारा विश्वास त्यांचा होता. माझ्या पाठीशी उभे राहून त्यांनी केलेली धडपड, दिलेले प्रोत्साहन आणि मनापासून दिलेला आशीर्वाद मी कधीही विसरू शकणार नाही. माझ्या यशात त्यांचा वाटा होता आणि माझ्या आयुष्यातील अनेक चांगल्या क्षणांच्या आठवणींमध्ये त्यांचे अस्तित्व कायम राहील.

आज ते आपल्यात नाहीत, ही जाणीव मनाला अस्वस्थ करून जाते. घरातील त्यांची उणीव तर जाणवतेच; पण एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगी मार्गदर्शनासाठी त्यांच्याकडे पाहावे आणि ते दिसू नयेत, ही पोकळी अधिकच वेदनादायी आहे. काही माणसे आपल्या आयुष्यातून निघून जातात; पण त्यांच्या आठवणी, त्यांचे संस्कार आणि त्यांनी दिलेले प्रेम कधीच आपल्यापासून दूर जात नाही.

निवृत्ती यशवंत लांडगे यांनी मला दिलेले संस्कार, विश्वास, प्रेम, मार्गदर्शन आणि साथ ही माझ्या आयुष्याची अमूल्य शिदोरी आहे. त्यांच्या विचारांची, आपुलकीची आणि मायेची आठवण प्रत्येक पावलावर माझ्यासोबत राहील. शरीराने ते आज आपल्यात नसले, तरी त्यांनी दिलेली मूल्ये आणि त्यांच्या प्रेमाच्या आठवणी माझ्या मनात सदैव जिवंत राहतील. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. मात्र त्यांच्या स्मृतींना जपत, त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणे आणि त्यांच्या विश्वासाला सदैव पात्र ठरणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

कैलासवासी निवृत्ती यशवंत लांडगे यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! त्यांच्या पावन आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली!

## ब्वाजी नानांच्या आठवणी शब्दांत मांडणे कठीण

**– शांताराम गोविंद लांडगे**
**मा. उपसरपंच, वडगाव लांडगा**

कै. निवृत्ती यशवंत लांडगे (बुवाजी नाना) यांच्या निधनाची बातमी मनाला अत्यंत वेदना देणारी. त्यांच्या जाण्याने माझ्या आयुष्यातील केवळ एक ज्येष्ठ व्यक्ती नव्हे, तर जिव्हाळयाचा सहकारी, मार्गदर्शक आणि आधारवड हरपला आहे. बुवाजी नानांनी आयुष्यभर पदापेक्षा माणसांना महत्त्व दिले. माणसे जोडणे, त्यांच्यातील क्षमता ओळखणे आणि योग्य वेळी संधी देणे हा त्यांचा स्वभाव होता. मी एक सर्वसामान्य कार्यकर्ता असताना माझ्यावर विश्वास ठेवून हनुमान दूध संस्थेच्या चेअरमनपदाची सात वर्षे जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपविली. तसेच उपसरपंच म्हणून पाच वर्षे काम करण्याची संधी मिळाली. या संधी माझ्यासाठी केवळ पद नव्हत्या, तर समाजासाठी काम करण्याची आणि लोकांमध्ये राहून शिकण्याची मोठी शिदोरी होती.

बुवाजी नानांचे सहकार क्षेत्रातील योगदानही उल्लेखनीय होते. सोसायटीचे चेअरमन म्हणून काम करताना संस्थेच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले. सोसायटीची इमारत उभी करण्यासाठीही त्यांनी विशेष योगदान दिले. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून काम करताना त्यांनी पदाचा उपयोग लोकांच्या प्रश्नांसाठी आणि समाजाच्या हितासाठी केला.

त्यांचा आणखी एक मोठा गुण म्हणजे सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती. निर्णय घेताना प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेणे, परिस्थिती समजून घेणे आणि माणसाला योग्य ती संधी देणे, यामुळे त्यांच्या सहवासात काम करणाऱ्या अनेकांना प्रेरणा मिळाली. माझ्या सामाजिक वाटचालीत त्यांनी दाखवलेला विश्वास आणि दिलेले मार्गदर्शन हा माझ्यासाठी आयुष्यभराचा अमूल्य ठेवा आहे. आज ते आपल्यात नाहीत, ही वस्तुस्थिती स्वीकारणे कठीण आहे. मात्र त्यांनी जोडलेली माणसे, दिलेल्या संधी आणि केलेले संस्कार यांच्या माध्यमातून बुवाजी नाना सदैव आपल्या स्मरणात राहतील.

कै. निवृत्ती यशवंत लांडगे (बुवाजी नाना) यांना भावपूर्ण श्रद्धांजली

- श्री. शांताराम गोविंद लांडगे
वडगाव लांडगा

### जीवाभावाचा सहकारी आणि सुख-दुःखात साथ देणारा मित्र

बुवाजी हे जिवाभावाचे सहकारी मित्र होते. सुख असो अथवा दुःख, प्रत्येक प्रसंगी ते खंबीरपणे सोबत उभे राहिले. गावच्या विकासकामांची दूरदृष्टी असलेले आणि सर्वसामान्य माणसाशी घट्ट नाळ जोडलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. साधेपणा, आपलेपणा आणि मनमोकळेपणा हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव होता. असा आमचा बुवाजी आज आम्हा सर्वांना सोडून गेला, याचे मोठे दुःख आहे. त्यांच्या आठवणी सदैव मनात जिवंत राहतील.

**- भाऊसाहेब शिवराम लांडगे**, माजी चेअरमन,
विविध कार्यकारी सोसायटी, वडगाव लांडगा

### साधा, सरळ आणि मनमोकळा मित्र काळाच्या पडद्याआड

माझा जिवाभावाचा मित्र बुवाजी म्हणजे साधे, सरळ आणि मनमोकळे व्यक्तिमत्त्व. मनात कोणताही कपटभाव नाही, प्रत्येकाशी आपुलकीने वागणारा आणि सुख-दुःखात नेहमी सोबत राहणारा माणूस. त्यांच्यासोबतचा काळ कधी निघून गेला, हे कळलेच नाही. आज ते आपल्यात नसले तरी त्यांच्या आठवणी मनात तितक्याच जिवंत आहेत. बुवाजी, तुझ्या जाण्याची ही वेळ नव्हती... तुझी उणीव कायम जाणवत राहील.

**- देविदास पुंडलिक शिंदे**, माजी चेअरमन,
हनुमान सहकारी दूध उत्पादक संस्था, वडगाव लांडगा

माझे स्नेही सहकारी मित्र आणि मार्गदर्शक गावच्या विकासात्मक राजकारणात मला उपरसपंच अगदी मोठ्या मनाने करणारे ब्वाजी नाना होते. त्यावेळेला कॉ. आनंदराव लांडगेंची साथ घेऊन मला उपसरपंच पदापर्यंत पोचवून माझा सत्कार करणारे ब्वाजी यांना माझ्या परिवाकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

**- अरुण लक्ष्मण लांडगे**, माजी उपसरपंच, वडगाव लांडगा


क्षणोक्षणी आमच्या मनी
आहे तुमची आठवण..
हीच आमच्या जीवनातील
अनमोल अशी साठवण..



असा जन्म लाभावा, देहाचा चंदन व्हावा ।
गंध संपला तरी सुगंध दरवळत रहावा ॥

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तसेच सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक

कै. निवृत्ती यशवंत लांडगे
यांना (बुवाजी नाना)

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

दशक्रिया विधी
बुधवार दि.०७/१०/२०२६ रोजी सकाळी ८.०० वा.
ठिकाण : पाण्याची टाकी, वडगाव लांडगा,
ता. संगमनेर, जि. अहिल्यानरग

शोकाकुल
गं.भा. मिनाबाई निवृत्ती लांडगे (पत्नी)
श्री. शिवाजी निवृत्ती लांडगे (मुलगा) सौ. योगिता शिवाजी लांडगे (सून)
सौ. लताबाई बाळासाहेब फापाळे (मुलगी) सौ. उज्वला अनिल कवडे (मुलगी)
सौ. सारिका विनायक कोल्हे (मुलगी) कै. शंकर यशवंत लांडगे (भाऊ)
श्री. सोपान यशवंत लांडगे (भाऊ) श्री. नारायण यशवंत लांडगे (भाऊ)
श्री. सुरेश यशवंत लांडगे (भाऊ) सौ. पुष्पलता गोपीनाथ डोंगरे (बहिण)
श्री. शशिकांत गोपीनाथ डोंगरे (भाचा)

समस्त लांडगे पा.परिवार व वडगाव लांडगा, ग्रामस्थ

प्रवचनसेवा
ह.भ.प. श्री. दत्तात्रय महाराज भोर
यांचा सुश्राव्य प्रवचनाचा कार्यक्रम होईल.



| अ | खे | र | चा | नि | रो | प |



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तसेच सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक

कै. निवृत्ती यशवंत लांडगे
यांना भावपूर्ण श्रध्दांजली

- शोकाकूल -

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
सहकारी साखर कारखाना, अमृतनगर
संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती, संगमनेर
आर. एम. कातोरे मित्र परिवार, धांदरफळ गट
युवक काँग्रेस, वडगाव लांडगा
ग्रामपंचायत कार्यालय, वडगाव लांडगा
विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, वडगाव लांडगा
हनुमान सहकारी दूध उत्पादक संस्था, वडगाव लांडगा
हनुमान सहकारी पतसंस्था, वडगाव लांडगा
राजवर्धन पाणीपुरवठा संस्था, वडगाव लांडगा
सक्सेस ॲग्रो मॉल, अकोले
बळीराजा कृषी सेवा केंद्र, वडगाव लांडगा